# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 24/03/2021 (बुधवार)

(दुपार)

---

### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण 1,84,700 रूपयाचा माल जप्त

पो.स्टे. उमरेड :– दिनांक 23/03/2021 रोजी उमरेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा तिखाडी येथे काही इसम गावठी मोहाफुल हातभट्टीची दारू गाळण्याचा अवैधरीत्या व विनापरवाना व्यवसाय करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे उमरेड पोलीसांनी नमुद घटनास्थळी धाडी टाकल्या असता यांमध्ये पो. स्टे. उमरेड येथे एकुण 18 केसेस मोहाफुल हातभट्टीची गावठी दारू बाळणाऱ्या अज्ञात आरोपीतांविरूध दाखल करण्यात आला आहे. यामध्ये घटनास्थळावरून 2300 लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि 147 लिटर मोहाफुल हातभट्टीची गावठी दारू व साहित्य असा एकुण 1,84,700/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर, पोलिस निरीक्षक श्री यशवंत सोलसे यांचे मार्गदर्शनात सपोनी राजेश पाटील, पोउपनि प्रशांत खोब्रागडे, सफौ ईश्वर जोधे, पोहवा रमेशचंद्र त्रिपाठी, अरूण जयसिंगपुरे, पोना मनोज वाघ, पोशि राम राठोड, गोवर्धन सहारे, सदाम शेख यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.





पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर